शुक्रवार, दि. १८ नोव्हेंबर,२०२२

आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या जन्मशताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त व्याख्यान

# १९४२ चा स्वातंत्र्य लढा आणि जी. डी. (बापू) लाड

## वक्ते – प्रा. राजा माळगी

## अहवाल

''क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील सातारा प्रतिसरकारच्या चळवळीने ब्रिटिश सरकारला खिळखिळे केले. त्यांच्या हस्तकांना धडा दिला. सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शक्य ते प्रयत्न केले जी. डी.बापूं आणि त्यांच्या सर्व सहकारी क्रांतिकारकांनी चळवळीला वाहून घेतले होते. तेव्हा विद्यार्थ्यांनी सातारा प्रतिसरकार चळवळ अभ्यासली पाहिजे'', असे प्रतिपादन आम. अरुण लाड यांनी केले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक वीरपाक्ष लुपणे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी समारंभाचे अध्यक्ष जे. के. (बापू) जाधव, प्रा. राजा माळगी, प्राचार्य टी. एस. भोसले, उपप्राचार्य काकासाहेब भोसले, स्वतंत्र सैनिक वीरपाक्ष लुपणे, तसेच ज्येष्ठ समाजसेवक व्हि. वाय. पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. राजा माळगी स्वतंत्र चळवळीचा रोमहर्षक इतिहास सांगताना म्हणाले, ''क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली व क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या शौर्यपूर्ण कामगिरीने सातारा प्रतिसरकारची चळवळ स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील सोनेरी पान ठरली आहे. या चळवळीला क्रांतिवीर उमाजी नाईक यांचा उठाव, महात्मा गांधीजींची १९३० पासूनची चळवळ आणि त्यापूर्वीच्या शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यात चळवळीने बहुजनांच्या उद्धाराची जी मूल्ये दिली त्या बळावर सत्ता, संपत्ती आणि ज्ञानाचे केंद्रीकरण बहुजनांच्या हाती आले. त्यासाठी सातारा प्रतिसरकारची चळवळ कार्यरत होती. सर्वार्थाने अठ्ठेचाळीस महिने कार्यरत असणाऱ्या प्रतिसरकार चळवळीचा ब्रिटिश साम्राज्य सत्तेने धसका घेतला होता.''

याप्रसंगी प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बबन पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. काकासाहेब भोसले यांनी आभार मानले, तर डॉ. तेजस चव्हाण व प्रा. स्वाती मगदूम यांनी सूत्रसंचालन केले. समारंभास महाविद्यालयातील विद्यार्थी, सेवक, पालक, कवी व पत्रकार संदिप नाझरे, पुढारी वार्तापत्राचे पत्रकार तुकाराम धायगुडे, सकाळ वार्तापत्राचे पत्रकार किशोर आरबुने, लोकमत वार्तापत्राचे पत्रकार समीर कस्तुरे उपस्थित होते.

निष्पत्ती : महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य चळवळ व या चळवळीतील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांचे योगदान समजले.

लाभार्थी : 350

काही क्षणचित्रे....

विषय – १९४२ चा स्वातंत्र्य लढा आणि जी. डी. (बापू) लाड

वक्ते – मा. प्रा. राजा माळगी













विभागप्रमुख
मराठी विभाग

मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

प्र. प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.